# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ०५/०३/२०१९ रोजी दुपारी १.३० वाजता आयोजित केलेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे स्थायी कार्यवृत्त

---

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची अर्थसंकल्पीय विशेष बैठक मंगळवार, दिनांक ०५ मार्च २०१९ रोजी दुपारी १.३० वाजता गुलझारीलाल नंदा सभागृह, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई : ४०० ०५१ येथे आयोजित करण्यात आली.

- **सदरहू बैठकीस खालील प्रमाणे उपस्थिती होती :---**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **मा. श्री.उदय सामंत** | : | **अध्यक्ष / प्राधिकरण** |
| २. | **मा.श्री. मिलिंद म्हैसकर** | : | **उपाध्यक्ष/प्राधिकरण** |
| ३. | **मा.श्री. संजय कुमार<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग** | : | **सदस्य/ प्राधिकरण** |

- सदरहू बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून खालीलप्रमाणे मंडळांचे सभापती उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **मा.श्री. मधु चव्हाण** | : | **सभापती, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ** |
| २. | **मा.श्री. विनोद घोसाळकर** | : | **सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ** |
| ३. | **मा.श्री. विजय नाहटा** | : | **सभापती, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ.** |
| ४. | **मा.श्री. बाळासाहेब पाटील** | : | **सभापती, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.** |
| ५. | **मा.श्री. महंमद तारिक कुरेशी** | : | **सभापती, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.** |

मा. डॉ. नितिन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१, तथा सदस्य / प्राधिकरण यांनी मंत्रीमंडळ बैठक असल्यामुळे सदर बैठकीस उपस्थित राहणार नसल्याचे कळविले होते. सदर अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

बैठकीस सुरुवात होण्यापूर्वी सचिव / प्राधिकरण यांनी मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांचे तसेच सर्व सन्माननीय उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष / प्रा. यांच्या परवानगीने विषय सुचीवरील विषय चर्चेस घेण्यात आले.

## बाब क्रमांक : १

**विषय :- प्राधिकरणाचा सन २०१८-१९ चे सुधारीत अर्थसंकल्प अंदाजपत्रक व सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सभेचे पदसिध्द अध्यक्ष तथा उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २०१८-२०१९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २०१९-२०२० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्राधिकरणाच्या बैठकीत सादर केले.

वित्त नियंत्रक / प्रा. यांनी विषद केले की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ३०(१) अन्वये मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांनी महाराष्ट्र गृहनिर्माणु व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्रत्येक वर्षी ३१ मार्च तारखेपूर्वी प्राधिकरणाच्या विशेष बैठकीत मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील मंडळाकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकांचे एकत्रिकरण करुन प्राधिकरणाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक एकत्रित तयार करण्यात आले आहे. प्राधिकरणांतर्गत मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद

व कोकण ही सात प्रादेशिक गृहनिर्माण मंडळे व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई झोपडपटटी सुधार मंडळ व प्राधिकरण खुदद या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकाचे प्राधिकरणाच्या एकत्रित अंदाजपत्रकात समावेश करण्यात आलेला आहे.

शासनाच्या निर्देशानुसार मुंबई शहर बेटावरील उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी सन २०१८-१९ साठी रु.१००.०० कोटी व सन२०१९-२० साठी रु. १००.०० कोटी इतका अग्रीम निधी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास वितरीत करण्यासाठी प्राधिकरणाच्या ठराव क्र.६७९७ दि.०२/११/२०१८ अन्वये म्हाडा अग्रीम निधी म्हणून तरतुद केल्यामुळे म्हाडाचा सन २०१८-१९ चा पुरवणी अर्थसंकल्प मंजूर केला व त्यानुसार म्हाडाचा सन २०१८-१९चा अर्थसंकल्प रु. ३२१.१२ कोटी तुटीचा मंजूर करण्यात आला.

शासनाकडून सन २०१८-१९ व सन २०१९-२० मध्ये प्रत्यक्ष प्राप्त होणारा निधी विचारात घेवून प्राधिकरण[खुद्द] व संबंधित मंडळानी प्रस्तावित केलेले अंदाज सन २०१८-१९ सुधारीत व सन २०१९-२० च्या प्रस्तावित अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आले आहेत.

प्राधिकरणाचा सन २०१८-१९ चा सुधारित व सन २०१९-२० चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचा जमा व खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे -

**महसुली जमा -**

सन २०१८-१९ चा जमेचा मुळ अर्थसंकल्प रु. १२८२.३८ कोटी आहे. सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पामध्ये रु.१११७.१० कोटी तर सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पामध्ये रु.१५२९.८५ कोटी अर्थसंकल्पीय तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे. सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पामध्ये मुंबई व मुं.इ.दु.व पु.मंडळाने अंदाजपत्रकीय तरतूदींपेक्षा भाडे व सेवाकराची केलेली कमी वसूली ही कारणे आहेत.

महाराष्ट्र शासनाने म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे. या प्रक्रियेमार्फत यावर्षी रु.५० कोटी प्राप्त झाले व पुढील वर्षी रु. १०० कोटी म्हाडास महसूल मिळेल. तसेच, सिडको ला लॉटरी सॉफ्टवेअर दिले त्यातून रु. १.०० कोटी महसूल मिळाला.

**महसुली खर्च -**

सन २०१८-१९ च्या मुळ रु. १२१४.४६ कोटी महसुली खर्चाच्या तुलनेत सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पामध्ये रु.९५२.७३ कोटी इतका महसूली खर्च आहे. सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पामध्ये महसूली खर्च रु. १०४८.४८ कोटी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**भांडवली जमा -**

सन २०१८-१९ च्या मुळ रु. ४३६६.७५कोटी प्रस्तावित भांडवली जमेच्या तुलनेत सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पात रु.१६७९.७० कोटी तर सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पामध्ये रु ५०१०.१६ कोटी प्रस्तावित करण्यात आली आहे. सन २०१८-१९ च्या अपेक्षित जमेची तरतूद कमी झाल्याचे कारण म्हणजे सर्वच विभागीय मंडळाकडील गाळे विक्री प्रक्रीया प्रगती पथावर असल्याने अपेक्षित जमा प्रत्यक्षात प्राप्त झाली नाही.

**भांडवली खर्च -**

सन २०१८-१९ च्या मुळ रु.५१८०.५१ कोटी भांडवली खर्चाच्या तुलनेत सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पामध्ये रु. २६०७.७५ कोटी तर सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पामध्ये रु. ४८४७.१६ कोटी प्रस्तावित करण्यात आला आहे. यामध्ये मुंबई मंडळाने पुढील वर्षाकरिता त्यांच्या वसाहतीतील पाणी पुरवठा व मलनिस:रण वाहिनी उन्नतीकरणाकरिता रु. २२५ कोटी तरतूद प्रस्तावित केली आहे.

**बांधकाम कार्यक्रम -**

म्हाडास दरवर्षी प्राप्त होणारे अधिक्य पुढील ५ वर्षात म्हाडा कायदयातील बाबींवर खर्च करण्यात येईल असे आयकर विभागाला प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. सन २०१७-१८ च्या लेखापरिक्षित लेख्यांनुसार म्हाडाचे संचित अधिक्य रु. ११९२१.१० कोटी असून त्याचा भाग स्वरुपात सन २०१९-२० चे भांडवली खर्चाचे रु. ३७३३.५० कोटी चा बांधकाम कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

प्राधिकरणाचा सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात युनिट १५४३० करिता बांधकाम कार्यक्रम रु.४३९८.२१ कोटीचा प्रस्तावित करण्यात आला होता. सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पात ८९९२ युनिट करिता बांधकाम कार्यक्रम रु. १७१३.७० कोटी करण्यात आलेला आहे. तसेच

सन २०१९-२० च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात ९७६९ युनिट करिता रु. ३७३३.५० कोटीचा बांधकाम कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे.

सन २०१८-१९ च्या मंजूर बांधकाम कार्यक्रमामध्ये भूसंपादन व भूविकास याकरिता रु. १२४.९४ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली होती ती सुधारित करुन रु. १८१.६० कोटी इतकी करण्यात आलेली आहे. तसेच सन २०१९-२० च्या प्रस्तावित बांधकाम कार्यक्रमांमध्ये भुसंपादन व भुविकास करिता रु. १९८.१० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

**पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी व धारावी येथील बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठीची तरतूद**

अवर सचिव गृहनिर्माण विभाग यांनी दि. २८/११/२०१३ रोजीच्या पत्रानुसार पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी व धारावी येथील बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीकरिता सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या ५ वर्षाच्या कालावधी करिता प्रतिवर्ष रु. २५ कोटी ची तरतूद म्हाडाने करावी असे निर्देश आहेत [सोबत प्रत]. त्यानुसार एकूण रु. २५ कोटी रकमेपैकी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास रु. १८ कोटी व मुंबई मंडळास रु. ७ कोटी निधी वितरीत करण्यास मा. उपाध्यक्ष /प्रा. यांनी मंजूरी दिली आहे [सोबत टिप्पणीची प्रत]. आता मुख्य अभियंता - २, ३ /प्रा. यांनी खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित केल्या आहेत.

[रुपये कोटीत ]

| | मुळ तरतूद २०१८-१९ | सुधारित तरतूद २०१८-१९ | प्रस्तावित तरतूद २०१९-२० |
|---|---|---|---|
| मुंबई मंडळ | ७.०० | ११.०० | ९.५० |
| मुं.इ. दु.व पु. मंडळ | १८.०० | १९.८४ | १४.१० |
| एकूण | २५.०० | ३०.८४ | २३.६० |

त्यामुळे म्हाडाचा सन २०१८-१९ चा सुधारित अर्थसंकल्प रु. ८९.४६ कोटी तुटीचा व सन २०१९-२० चा प्रस्तावित अर्थसंकल्प रु. १३८३.६३ कोटी शिल्लकीचा असल्याचे सांगितले.

## प्राधिकरण ( खुद्द )

## दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

( रुपये लाखात )

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | **जमा** | | | |
| १ | महसूली | ३८५२६.९६ | ५७११६.७३ | ७३८९०.६५ |
| २ | भांडवली | ५०.०० | १५.४० | २०.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | २३७०३.६० | ३५९०२.१९ | ४१७९३.१० |
| ४ | अनामत | २७६५७.२५ | ८१०८९.७४ | ७००१८.०० |
| | **एकुन म्हाडा** | **८९९३७.८१** | **१७४१२४.०६** | **१८५७२१.७५** |
| ५ | शासन अनुदान | १०५.५० | २८.६७ | ३०.०० |
| | **एकूण म्हाडा + शासन** | **९००४३.३१** | **१७४१५२.७३** | **१८५७५१.७५** |
| | **खर्च** | | | |
| १ | महसूली | ३४९२५.०९ | ४२०४७.३४ | ४०९८२.५१ |
| २ | भांडवली | ८५६.९० | ८१७.७१ | १६८२.९० |
| ३ | कर्जे व अग्रिम | ३०७३.०० | १४७१८.०० | १५१४२.०० |
| ४ | अनामत | २७६५७.२५ | ७२६५३.८९ | ६१३५५.२५ |
| | **एकुण म्हाडा** | **६६५१२.२४** | **१३७२३६.९४** | **११९१६२.६६** |
| ५ | शासन अनुदान | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण म्हाडा + शासन** | **६६५१२.२४** | **१३७२३६.९४** | **११९१६२.६६** |
| | **पुरवणी अर्थसंकल्प सन २०१८-१९ (म्हाडा अग्रीम निधी)** | **१००००.००** | | |
| | **शिल्लक (+)/ तूट (-)** | **१३५३१.०७** | **३६९१५.७९** | **६६५८९.०९** |

# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

## दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

( रुपये लाखात )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | ६७३५४.७९ | ३०१९१.९२ | ५१२५८.४७ |
| २ | भांडवली | १३६९३८.४२ | २५४३२.७१ | १३९८७९.३१ |
| ३ | कर्जे व अग्रिम | २११.०० | ६६.९० | ६२.३८ |
| ४ | अनामत | ६६९.८० | ३७४.७७ | ५०९.०० |
| | **एकूण** | **२०५१७४.०१** | **५६०६६.३०** | **१९१७०९.१६** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | ४९१८५.०१ | १५१७७.७४ | २६७३१.३४ |
| २ | भांडवली | १८९६४३.११ | ९५७६९.७८ | २१७८६६.१७ |
| ३ | कर्जे व अग्रिम | १०४.१० | ४१.०८ | ८२.०२ |
| ४ | अनामत | ५५८.५० | ८७४.४६ | ८०८.०० |
| | **एकुण** | **२३९४९०.७२** | **१११८६३.०६** | **२४५४८७.५३** |
| | **शिल्लक (+) / (-)** | **-३४३१६.७१** | **-५५७९६.७६** | **-५३७७८.३७** |

| पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे<br>दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प<br>(रुपये लाखात) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | ५१४.०५ | ७५२७.८५ | ३६७६.३५ |
| २ | भांडवली | २४६७८.७९ | २९८१०.८९ | ९५७१०.३६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | ३०.५० | २५.०० | ३३.०० |
| ४ | अनामत | ५३७.६० | १७५६.३२ | ८८७.८० |
| **एकुण** | | **२५७६०.९४** | **३९१२०.०६** | **१००३०७.५१** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | २६५०.४८ | १८२०.९३ | २६२१.५० |
| २ | भांडवली | ५३१२९.०० | ३०६३१.०० | ५४४६२.५० |
| ३ | कर्जे व अग्रिम | ३६.१० | २३.०० | ३५.५० |
| ४ | अनामत | ५५२.०० | १३८७.९७ | १९६२.०० |
| **एकुण** | | **५६३६७.५८** | **३३८६२.९०** | **५९०८१.५०** |
| **शिल्लक (+)/तुट (-)** | | **-३०६०६.६४** | **५२५७.१६** | **४१२२६.०१** |

## नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक

## दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

( रुपये लाखात )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | २६७.०० | २४९.७६ | २८९.२९ |
| २ | भांडवली | १८३७७.७३ | २८४८.८७ | २६३३२.८२ |
| ३ | कर्जे व अग्रिम | १७.५० | १५.६० | १६.५० |
| [illegible] | अनामत | २५०.०० | १८७.२५ | २६५.०० |
| | **एकूण** | **१८९१२.२३** | **३३०१.४८** | **२६९०३.६१** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | ११२८.७५ | १२४५.५३ | १०८९.१० |
| २ | भांडवली | १३५०४.८० | २७५२.१५ | १२२८७.३० |
| ३ | कर्जे व अग्रिम | ५.५० | ८.१५ | ८.७५ |
| ४ | अनामत | २१०.२५ | १७६.४१ | २००.२५ |
| | **एकूण** | **१४८४९.३०** | **४१८२.२४** | **१३५८५.४०** |
| | **शिल्लक (+)/ तूट( - )** | **४०६२.९३** | **-८८०.७६** | **१३३१८.२१** |

## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद

### दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

( रुपये लाखात )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | १७७.५० | २१२.७० | २४०.०० |
| २ | भांडवली | १८३९१.०० | २५४१.१० | १३४८७.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | १७.०० | २०.०० | ४२.०० |
| ४ | अनामत | २०६६.०० | २०९६.५९ | २०८०.[illegible] |
| | **एकूण** | **२०६५१.५०** | **४८७०.३९** | **१५८४९.००** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | २०१०.६० | १७८९.०८ | २४३९.६० |
| २ | भांडवली | १२४५२.५० | १९१४.२१ | १०६५५.४० |
| ३ | कर्जे व अग्रिम | ६१.०० | २३.८८ | २४.०० |
| ४ | अनामत | ५३७.०० | ५६७.२६ | ८२०.०० |
| | **एकूण** | **१५०६१.१०** | **४२९४.४३** | **१३९३९.००** |
| | **शिल्लक (+)/ तूट (-)** | **५५९०.४०** | **५७५.९६** | **१९१०.००** |

| नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर<br>दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प<br>(रुपये लाखात ) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | ५०८.९५ | ५७०.४५ | ५१५.९५ |
| २ | भांडवली | ४४५४५.०० | १२९६७.०० | ३४९३७.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | १४.५० | २६.५० | २६.५० |
| ४ | अनामत | २८४०.०० | २५३३.०० | ३१२०.०० |
| | **एकूण** | **४७९०८.४५** | **१६०९६.९५** | **३८५९९.४५** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | २४४१.४९ | १५५३.२९ | १४६०.६२ |
| २ | भांडवली | ४५७६३.५० | ३४०९८.५० | ५७१४८.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | १५.७९ | २२.०४ | २२.०० |
| ४ | अनामत | १४७५.०० | ४६०.०० | ५१०.०० |
| | **एकूण** | **४९६९५.७८** | **३६१३३.८३** | **५९१४०.६२** |
| | **शिल्लक (+) / तूट (-)** | **-१७८७.३३** | **-२००३६.८८** | **-२०५४१.१७** |

## अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, अमरावती

### दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

(रुपये लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | **जमा** | | | |
| १ | महसूली | ९८.७५ | १११.३२ | ११४.१५ |
| २ | भांडवली | १३२०६.२५ | ४४६१.१० | १५९२६.२५ |
| ३ | कर्जे व अग्रिम | १२.५० | १९.२७ | २२.२५ |
| ४ | अनामत | ५२७.५० | ४४५.५० | ६१६.५० |
| | **एकूण** | **१३८४५.००** | **५०३७.१९** | **१६६७९.१५** |
| | **खर्च** | | | |
| १ | महसूली | ६०६.३० | ५८१.५३ | ८३०.०५ |
| २ | भांडवली | १३२०६.०० | ४५८३.९९ | १६०५१.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | ६.०० | १४.७७ | १६.०५ |
| ४ | अनामत | ७५.०० | ५४.०० | ८०.०० |
| | **एकूण** | **१३८९३.३०** | **५२३४.२९** | **१६९७७.१०** |
| | **शिल्लक ( + ) / तूट (-)** | **-४८.३०** | **-१९७.१०** | **-२९७.९५** |

## कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

## दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

(रुपये लाखात)

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| **जमा** | | | | |
| १ | महसूली | ९३३५.३६ | ६३२०.३९ | ९७८२.८० |
| २ | भांडवली | १४४०३३.०० | ५०३०३.३६ | १४२००३.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | १५.२० | १४.२६ | १८.२५ |
| ४ | अनामत | २८५.०० | ७५७.३५ | ४३०.०० |
| **एकुण** | | **१५३६६८.५६** | **५७३९५.३६** | **१५२२३४.०५** |
| **खर्च** | | | | |
| १ | महसूली | ७१८८.५० | ३५८०.६३ | ५९०२.५५ |
| २ | भांडवली | १३३२६३.२० | २८६१९.५८ | ५६१५२.२० |
| ३ | कर्जे व अग्रिम | ८.२० | ६.५० | ११.२० |
| ४ | अनामत | १४०६.०० | ६८२.४७ | १६५०.१० |
| **एकुण** | | **१४१८६५.९०** | **३२८८९.१८** | **६३७१६.०५** |
| **शिल्लक (+) / तूट (-)** | | **११८०२.६६** | **२४५०६.१८** | **८८५१८.००** |

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ

## दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

( रुपये लाखात )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | **जमा** | | | |
| १ | महसूली | ९८७०.०० | ८०३२.०० | ११८४०.०० |
| २ | भांडवली | १४५०.०० | ५२५.०० | ७३०.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | ७२.५० | ५६.७० | ६८.०० |
| ४ | अनामत | ३७६०.०० | ४६८९.०० | ४२८५.०० |
| | **एकुण** | **१५१५२.५०** | **१३३०२.७०** | **१६९२३.००** |
| ५ | शासकीय अनुदान | २७००६.०० | ३२५८९.३५ | ३५९१३.९० |
| | **एकूण** | **४२१५८.५०** | **४५८९२.०५** | **५२८३६.९०** |
| | **खर्च** | | | |
| १ | महसूली | १९७२५.८५ | १९२०४.१३ | २१३२६.९० |
| २ | भांडवली | २१२२७.२१ | २२५०४.६० | २६४००.४६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | ९७.०० | ६८.३५ | ७४.०० |
| ४ | अनामत | २७३५.०० | ३७३०.०० | ३७८५.०० |
| | **एकुण** | **४३७८५.०६** | **४५५०७.०८** | **५१५८६.३६** |
| ५ | शासकीय अनुदान | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **४३७८५.०६** | **४५५०७.०८** | **५१५८६.३६** |
| | **शिल्लक (+) / तूट (-)** | **-१६२६.५६** | **३८४.९७** | **१२५०.५४** |

# मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

## दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

(रुपये लाखात )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | **जमा** | | | |
| १ | महसूली | १५८४.५० | १३७६.४५ | १३७७.१० |
| २ | भांडवली | ३५००५.०० | ३९०६५.०० | ३१९९०.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | १८.५५ | १७४.९० | ७७.०० |
| ४ | अनामत | ४००४.०० | १८५५.०० | १८६०.०० |
| | **एकुण** | **४०६१२.०५** | **४२४७१.३५** | **३५३०४.१०** |
| ५ | शासकीय अनुदान | २०२१६.०० | १४३८४.२३ | ९८००.०० |
| | **एकूण** | **६०८२८.०५** | **५६८५५.५८** | **४५१०४.१०** |
| | **खर्च** | | | |
| १ | महसूली | १५८४.३० | १२७२.८५ | १४६४.२० |
| २ | भांडवली | ३५००५.०० | ३९०८३.०० | ३२०१०.०० |
| ३ | कर्जे व अग्रिम | २०.८५ | १७०.२५ | ७१.२५ |
| ४ | अनामत | २७१५.०० | १६२०.०० | १५९०.०० |
| | **एकुण** | **३९३२५.१५** | **४२१४६.१०** | **३५१३५.४५** |
| ५ | शासकीय अनुदान | २०२१६.०० | १४३८४.२३ | ९८००.०० |
| | **एकुण** | **५९५४१.१५** | **५६५३०.३३** | **४४९३५.४५** |
| | **शिल्लक (+) / तूट (-)** | **१२८६.९०** | **३२५.२५** | **१६८.६५** |

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

## दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

(रुपये कोटीत )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | **जमा** | | | |
| १ | महसूली | १२८२.३८ | १११७.१० | १५२९.८५ |
| २ | भांडवली | ४३६६.७५ | १६७९.७० | ५०१०.१६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | २४१.१३ | ३६३.२१ | ४२१.५९ |
| ४ | अनामत | ४२५.९७ | ९५७.८५ | ८४०.७१ |
| | **एकुण** | **६३१६.२३** | **४११७.८६** | **७८०२.३१** |
| ५ | शासकीय अनुदान | ४७३.२८ | ४७०.०२ | ४५७.४४ |
| | **एकूण म्हाडा + शासन** | **६७८९.५१** | **४५८७.८८** | **८२५९.७५** |
| | **खर्च** | | | |
| १ | महसूली | १२१४.४६ | ९५२.७३ | १०४८.४८ |
| २ | भांडवली | ५१८०.५१ | २६०७.७५ | ४८४७.१६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | ३४.२८ | १५०.९६ | १५४.८७ |
| ४ | अनामत | ३७९.२१ | ८२२.०६ | ७२७.६१ |
| | **एकुण** | **६८०८.४६** | **४५३३.५०** | **६७७८.१२** |
| ५ | शासकीय अनुदान | २०२.१६ | १४३.८४ | ९८.०० |
| | **एकुण म्हाडा + शासन** | **७०१०.६२** | **४६७७.३४** | **६८७६.१२** |
| | **पुरवणी अर्थसंकल्प सन २०१८-१९ (म्हाडा अग्रीम निधी)** | **१००.००** | | |
| | **शिल्लक (+) / तूट (-)** | **-३२१.१२** | **-८९.४६** | **१३८३.६३** |

वित्त नियंत्रक / प्रा. यांनी असे निदर्शनास आणले कीं, निवासी कार्यकारी अभियंता/ मुंबई मंडळ हयांनी कळविले आहे की मा.सभापती / मुंबई मंडळ हयांनी दिनांक २/३/२०१९ रोजी मुंबई मंडळाच्या मंजूर बांधकाम कार्यक्रमाचा आढावा घेतला तेव्हा संबंधित विभागाच्या कार्यालय प्रमुखांनी काही योजनांबाबतचा फेर आढावा घेऊन सन २०१८-१९ ची सुधारित तरतुद व २०१९-२० च्या तरतुदीमध्ये बदल प्रस्तावित केले आहेत [सोबत प्रत]. तसेच मा. सभापती/ पुणे मंडळ हयांनी प्राधिकरणाच्या दिनांक २८/२/२०१९ च्या बैठकितील चर्चेनुसार पुणे मंडळातील योजनांमधील पायाभूत सुविधांकरिता रु.५० कोटी सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केले आहेत

अर्थसंकल्पाची बाब टिप्पणी प्राधिकरणास दिनांक २८/२/२०१९ रोजी सादर केली आहे. सदर टिप्पणीमध्ये दर्शविण्यात आलेल्या भांडवली खर्चात मुंबई मंडळाने सन २०१८-१९चा सुधारित व सन २०१९-२० अर्थसंकल्पात सुधारणा प्रस्तावित केल्यामुळे व पुणे मंडळाने सन २०१९-२०च्या अर्थसंकल्पात सुधारणा प्रस्तावित केल्यामुळे अर्थसंकल्पातील भांडवली खर्चात खालील बदल होतील.

**भांडवली खर्च**

[रुपये कोटीत]

| | मंजूर तरतूद | | प्रस्तावित तरतूद | |
|---|---|---|---|---|
| मंडळ | सन २०१८-१९सुधारित | सन २०१९-२० प्रस्तावित | सन २०१८-१९सुधारित | सन २०१९-२० प्रस्तावित |
| मुंबई मंडळ | ९५७.७० | २१७८.६६ | ९९४.९३ | १९४५.४६ |
| पुणे मंडळ | ३०६.३१ | ५४४.६३ | ३०६.३१ | ५९४.६३ |
| | १२६४.०१ | २७२३.२९ | १३०१.२४ | २५४०.०९ |

त्यामुळे म्हाडाचा सन २०१८-१९ चा सुधारित भांडवली खर्च रु. २६४४.९८ कोटी व सन २०१९-२० चा भांडवली खर्च रु.४६६३.९६ कोटी प्रस्तावित करण्यात आला आहे.

मा. अध्यक्ष व मा. सदस्यांनी उपरोक्त बदलाच्या अनुषंगाने अर्थसंकल्पास मान्यता दिल्यास उपरोक्त खर्चाच्या तरतुदी घेवून मुंबई मंडळ व पुणे मंडळाचा अर्थसंकल्प खालीलप्रमाणे होईल असे वित्त नियंत्रक / प्रा. यांनी सांगितले.

## मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

### दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

( रुपये लाखात )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | ६७३५४.७९ | ३०१९१.९२ | ५१२५८.४७ |
| २ | भांडवली | १३६९३८.४२ | २५४३२.७१ | १३९८७९.३१ |
| ३ | कर्जे व अग्रिम | २११.०० | ६६.९० | ६२.३८ |
| ४ | अनामत | ६६९.८० | ३७४.७७ | ५०९.०० |
| | **एकूण** | **२०५१७४.०१** | **५६०६६.३०** | **१९१७०९.१६** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | ४९१८५.०१ | १५१७७.७४ | २६७३१.३४ |
| २ | भांडवली | १८९६४३.११ | ९९४९२.७८ | १९४५४६.१७ |
| ३ | कर्जे व अग्रिम | १०४.१० | ४१.०८ | ८२.०२ |
| ४ | अनामत | ५५८.५० | ८७४.४६ | ८०८.०० |
| | **एकुण** | **२३९४९०.७२** | **११५५८६.०६** | **२२२१६७.५३** |
| | **शिल्लक (+) / (-)** | **-३४३१६.७१** | **-५९५१९.७६** | **-३०४५८.३७** |

| पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे<br>दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प<br>(रुपये लाखात) | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **लेखाशिर्ष** | **मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९** | **सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९** | **अर्थसंकल्प सन २०१९-२०** |
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | ५१४.०५ | ७५२७.८५ | ३६७६.३५ |
| २ | भांडवली | २४६७८.७९ | २९८१०.८९ | ९५७१०.३६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | ३०.५० | २५.०० | ३३.०० |
| ४ | अनामत | ५३७.६० | १७५६.३२ | ८८७.८० |
| | **एकुण** | **२५७६०.९४** | **३९१२०.०६** | **१००३०७.५१** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | २६५०.४८ | १८२०.९३ | २६२१.५० |
| २ | भांडवली | ५३१२९.०० | ३०६३१.०० | ५९४६२.५० |
| ३ | कर्जे व अग्रिम | ३६.१० | २३.०० | ३५.५० |
| ४ | अनामत | ५५२.०० | १३८७.९७ | १९६२.०० |
| | **एकुण** | **५६३६७.५८** | **३३८६२.९०** | **६४०८१.५०** |
| | **शिल्लक (+)/तुट (-)** | **-३०६०६.६४** | **५२५७.१६** | **३६२२६.०१** |

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने मंजूर बांधकाम कार्यक्रमात सुधारणा केल्यामुळे पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी व धारावी येथील बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीकरिता मुंबई मंडळाची व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

[रुपये कोटीत ]

| | मुळ तरतूद २०१८-१९ | सुधारित तरतूद २०१८-१९ | प्रस्तावित तरतूद २०१९-२० |
|---|---|---|---|
| मुंबई मंडळ | ७.०० | ७.४० | १३.१० |
| मुं.इ. दु.व पु. मंडळ | १८.०० | १९.८४ | १४.१० |
| एकूण | २५.०० | २७.२४ | २७.२० |

उपरोक्त करण्यात आलेल्या सुधारणा मंजूर सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली. व सदर सुधारणांमुळे म्हाडाचा सन २०१८-१९ चा सुधारित अर्थसंकल्प रु. १२६.६९ कोटी तुटीचा व सन २०१९-२० चा प्रस्तावित अर्थसंकल्प रु. १५६६.८३ कोटी शिल्लकीचा असल्याचे निदर्शनास आणून दिले.

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

### दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

(रुपये कोटीत )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | **जमा** | | | |
| १ | महसूली | १२८२.३८ | १११७.१० | १५२९.८५ |
| २ | भांडवली | ४३६६.७५ | १६७९.७० | ५०१०.१६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | २४१.१३ | ३६३.२१ | ४२१.५९ |
| ४ | अनामत | ४२५.९७ | ९५७.८५ | ८४०.७१ |
| | **एकुण** | **६३१६.२३** | **४११७.८६** | **७८०२.३१** |
| ५ | शासकीय अनुदान | ४७३.२८ | ४७०.०२ | ४५७.४४ |
| | **एकुण म्हाडा + शासन** | **६७८९.५१** | **४५८७.८८** | **८२५९.७५** |
| | **खर्च** | | | |
| १ | महसूली | १२१४.४६ | ९५२.७३ | १०४८.४८ |
| २ | भांडवली | ५१८०.५१ | २६४४.९८ | ४६६३.९६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | ३४.२८ | १५०.९६ | १५४.८७ |
| ४ | अनामत | ३७९.२१ | ८२२.०६ | ७२७.६१ |
| | **एकुण** | **६८०८.४६** | **४५७०.७३** | **६५९४.९२** |
| ५ | शासकीय अनुदान | २०२.१६ | १४३.८४ | ९८.०० |
| | **एकुण म्हाडा + शासन** | **७०१०.६२** | **४७१४.५७** | **६६९२.९२** |
| | **पुरवणी अर्थसंकल्प सन २०१८-१९ (म्हाडा अग्रीम निधी)** | **१००.००** | | |
| | **शिल्लक (+) / तूट (-)** | **-३२१.१२** | **-१२६.६९** | **१५६६.८३** |

सविस्तर चर्चा होऊन सादर केलेला सुधारीत अर्थसंकल्प व २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सन्माननीय सदस्यांनी समाधानकार असल्याचे नमूद केले व सदर अंदाजपत्रकास सहमती दर्शविली.

बाब टिप्पणीतील प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून

**ठराव क्रमांक : ६८५९** **दिनांक : ०५/०३/२०१९**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २०१८-१९ चा सुधारीत अर्थसंकल्प रक्कम रु.१२६.६९ कोटी रक्कमेच्या तूटीचा व सन २०१९-२० चा अर्थसंकल्प रक्कम रु. १५६६.८३ कोटी शिल्लकेचा मान्य करण्यात आला. सन २०१९-२० साटी रु. ४६६०.३६ कोटी इतक्या रकमेचा भांडवली खर्चाचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.यामध्ये मुंबई मंडळ व पुणे मंडळाने त्यांच्या वसाहतीतील पायाभूत सुविधा उदा. पाणीपुरवटा व मलनिस:रण वाहीनी उन्नतीकरणा करिता अनुक्रमे रु.२२५ कोटी व रु.५० कोटी ची केलेली तरतुद अंतर्भुत आहे.

अवर सचिव गृहनिर्माण विभाग यांचे दि.२८/११/२०१३ रोजीच्या पत्रानुसार पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी व धारावी विकास योजनेमध्ये बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तींकरिता सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या पाच वर्षाच्या कालावधी करिता प्रतिवर्ष रु.२५ कोटी ची तरतूद म्हाडाने करावी असे निर्देश आहेत. त्यानुसार एकूण रु.२५ कोटी रकमेपैकी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास रु.१८ कोटी व मुंबई मंडळास रु.७ कोटी निधी वितरीत करण्यास मा. उपाध्यक्ष / प्रा. यांनी मंजूरी दिली आहे. सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या कालावधीत मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ व मुंबई मंडळ यांनी अनुक्रमे रु.४५.४९ कोटी व रु.१६.०१ कोटी इतका खर्च केला असून दोन्ही मंडळांनी सदर प्रकल्पांतर्गतच्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे तरतुद प्रस्तावित केली आहे त्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

रुपये कोटीत

| | मुळ तरतुद २०१८-१९ | सुधारित तरतुद २०१८-१९ | प्रस्तावित तरतुद २०१९-२० |
|---|---|---|---|
| मुंबई मंडळ | ७.०० | ७.४० | १३.१० |
| मुं.इ.दु.व.पु.मंडळ | १८.०० | १९.८४ | १४.१० |
| एकूण | २५.०० | २७.२४ | २७.२० |

सदर प्रकल्पांतर्गत मंडळाने केलेल्या वर्षनिहाय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

रुपये कोटीत

| अ.क्र | वर्ष | मुं.इ.दु.व.पु.मंडळ | मुंबई मंडळ |
|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ५.८२ | ०.१० |
| २ | २०१५-१६ | ११.७१ | ३.४० |
| ३ | २०१६-१७ | १०.२८ | ६.९८ |
| ४ | २०१७-१८ | ९.५७ | ३.४७ |
| ५ | २०१८-१९(माहेफेब्रु.-२०१९ पर्यंत) | ८.११ | २.०६ |
| | **एकूण खर्च** | **४५.४९** | **१६.०१** |

उपरोक्त तपशिलावरुन असे दिसते की, दरवर्षीच्या रु.२५ कोटी तरतुदीसापेक्ष खर्च झालेला नाही. एकूण रु.१२५ कोटी पैकी आतापर्यंत रु.६१.५० कोटी खर्च झाले असून रु.६३.५० कोटी मंडळाने खर्च न केल्यामुळे अखर्चित आहेत. या मुद्दयाबाबत प्राधिकरणाच्या बैठकीत उहापोह होवून सदर खर्चाकरीता कालावधी वाढवून देण्याबाबत चर्चा झाली व त्यानुसार दोन्ही मंडळांनी प्रस्तावीत केलेली तरतुद फक्त एक वर्षाच्या कालावधी करीताच मंजूर करण्याबाबत प्राधिकरणाने निर्णय घेतला.

पुणे मंडळाने पायाभूत सुविधा करीता केलेली तरतुद रु.५० कोटी व मुंबई मंडळाने मंजूर बांधकाम कार्यक्रमातील केलेल्या सुधारित तरतुदींचा तपशिल खालील शुध्दीपत्रकाप्रमाणे वाचण्यात यावा. तसेच मुंबई मंडळाचा दृष्टीक्षेपातला अर्थसंकल्प व म्हाडाचा दृष्टीक्षेपातला अर्थसंकल्प यास पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २०१८-१९ चे सुधारित अर्थसंकल्प अंदाजपत्रक व सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

### शुध्दीपत्रक
### मुंबई मंडळ

| मंजुर तरतुद | | | | | प्रस्तावित तरतुद | | ( रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सुधारित अंदाजपत्रकीय तरतुदी २०१८-१९ | अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय तरतुद २०१९-२० | अनु. क्र | २०१७-१८ च्या बांधकाम कार्यक्रमाप्रमाणे अनु.क्र | कामाचे नाव स्थळनिहाय व योजनानिहाय / भु.भु.क्र | सुधारित अंदाजपत्रकीय तरतुदी २०१८-१९ | अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय तरतुद २०१९-२० | शेरा |
| ५.०० | २५००.०० | ३५ | ३९ | कन्नमवार नगर, पिक्रोली | ५.०० | ०.०० | |
| १०.०० | ४५००.०० | ३६ | ४० | कन्नमवार नगर, पिक्रोली | १०.०० | ०.०० | |
| २००००.०० | २००००.०० | ६४ | ६९ | बॉम्बे डाइंग मिल | २४०००.०० | २००००.०० | |
| ४०८२.०० | ७५०.०० | ६५ | ७० | श्रीनिवास मिल | ५२००.०० | ३०००.०० | |
| ४००.०० | १००.०० | ६२ | ६७ | सेन्चुरी मिल | ४००.०० | १५०.०० | |
| ६०.०० | १०.०० | ५८ | ६३ | प्रकाश कॉटन मिल | ६०.०० | ५०.०० | |
| ५०.०० | १०.०० | ६० | ६५ | वेस्टर्न इंडिया मिल | ५०.०० | ४०.०० | |
| ८०.०० | ५.०० | ५७ | ६२ | ज्युबली मिल | ८०.०० | ३०.०० | |
| ३०.०० | १०.०० | ६६ | ७१ | रुबी मिल | ३०.०० | २०.०० | |
| ३५.०० | १०.०० | ५६ | ६१ | स्वान मिल, शिवडी | ४०.०० | १५.०० | |
| ५.०० | १००.०० | ३१ | ३५ | फीशरमन कॉलनी, माहिम | ५.०० | १०.०० | |
| ३०००.०० | ३०००.०० | ३० | ३४ | अॅन्टोप हिल | ३५००.०० | ३५००.०० | |
| ११००.०० | ९५०.०० | ६७ | ७२ | पी.एम.जी.पी. अंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींची विशेष दुरुस्ती | ७४०.०० | १३१०.०० | |
| मंजुर तरतुद | | | | | प्रस्तावित तरतुद | | ( रुपये लाखात) |

| सुधारित अंदाजपत्रकीय तरतुदी २०१८-१९ | अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय तरतुद २०१९-२० | अनु. क्र | २०१७-१८ च्या बांधकाम कार्यक्रमाप्रमाणे अनु.क्र | कामाचे नाव स्थळनिहाय व योजनानिहाय / भु.भु.क्र | सुधारित अंदाजपत्रकीय तरतुदी २०१८-१९ | अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय तरतुद २०१९-२० | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०.०० | १००००.०० | ११३ | १०० | भुसंपादन | १०.०० | ५००.०० | सदर तरतुद मुंबई मध्ये भविष्यात प्राप्त होणा-या जागेच्याभुसंपादना करीता केली आहे. |
| २००.०० | १०००.०० | १५० | १४४ | एक्सर बोरीवली (प) तटरक्षक दल | ८००.०० | १०००.०० | |
| ९०.०० | १००.०० | १७५ | १६३ | धारावी पुर्नविकास प्रकल्प टप्पा-१ अ इमारत क्र.१ | ५०.०० | १००.०० | |
| ४०२०.०० | २५०००.०० | १८५ | १७४ अ | एन.एम. जोशी मार्ग, लोअर परेल | ३३२०.०० | २५०००.०० | |
| ३००५.०० | १५०००.०० | १८६ | १७४ ब | नायगाव , दादर | २६०५.०० | ५०००.०० | |
| १५०२०.०० | १००००.०० | १८७ | १७६ अ | वरळी | १४०२०.०० | १००००.०० | |
| **५१२०२.००** | **९३०४५.००** | | | **एकूण** | **५४९२५.००** | **६९७२५.००** | |

## पुणे मंडळ

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०.०० | ०.०० | | | पुणे मंडळाच्या वसाहतीतील पाणीपुरवठा व मलनिस:रण वाहिनी उन्नतीकरण | ०.०० | ५०००.०० | |

# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

## दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

( रुपये लाखात )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | ६७३५४.७९ | ३०१९१.९२ | ५१२५८.४७ |
| २ | भांडवली | १३६९३८.४२ | २५४३२.७१ | १३९८७९.३१ |
| ३ | कर्जे व अग्रिम | २११.०० | ६६.९० | ६२.३८ |
| ४ | अनामत | ६६९.८० | ३७४.७७ | ५०९.०० |
| | **एकूण** | **२०५१७४.०१** | **५६०६६.३०** | **१९१७०९.१६** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | ४९१८५.०१ | १४८१७.७४ | २७०९१.३४ |
| २ | भांडवली | १८९६४३.११ | ९९८५२.७८ | १९४१८६.१७ |
| ३ | कर्जे व अग्रिम | १०४.१० | ४१.०८ | ८२.०२ |
| ४ | अनामत | ५५८.५० | ८७४.४६ | ८०८.०० |
| | **एकुण** | **२३९४९०.७२** | **११५५८६.०६** | **२२२१६७.५३** |
| | **शिल्लक (+) / (-)** | **-३४३१६.७१** | **-५९५१९.७६** | **-३०४५८.३७** |

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

### दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प

(रुपये कोटीत )

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०१८-१९ | सुधारित अर्थसंकल्प सन २०१८-१९ | अर्थसंकल्प सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| | | **जमा** | | |
| १ | महसूली | १२८२.३८ | १११७.१० | १५२९.८५ |
| २ | भांडवली | ४३६६.७५ | १६७९.७० | ५०१०.१६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | २४१.१३ | ३६३.२१ | ४२१.५९ |
| ४ | अनामत | ४२५.९७ | ९५७.८५ | ८४०.७१ |
| | **एकुण** | **६३१६.२३** | **४११७.८६** | **७८०२.३१** |
| ५ | शासकीय अनुदान | ४७३.२८ | ४७०.०२ | ४५७.४४ |
| | **एकूण म्हाडा + शासन** | **६७८९.५१** | **४५८७.८८** | **८२५९.७५** |
| | | **खर्च** | | |
| १ | महसूली | १२१४.४६ | ९४९.१३ | १०५२.०८ |
| २ | भांडवली | ५१८०.५१ | २६४८.५८ | ४६६०.३६ |
| ३ | कर्जे व अग्रिम | ३४.२८ | १५०.९६ | १५४.८७ |
| ४ | अनामत | ३७९.२१ | ८२२.०६ | ७२७.६१ |
| | **एकुण** | **६८०८.४६** | **४५७०.७३** | **६५९४.९२** |
| ५ | शासकीय अनुदान | २०२.१६ | १४३.८४ | ९८.०० |
| | **एकुण म्हाडा + शासन** | **७०१०.६२** | **४७१४.५७** | **६६९२.९२** |
| | **पुरवणी अर्थसंकल्प सन २०१८-१९ (म्हाडा अग्रीम निधी)** | १००.०० | | |
| | शिल्लक (+) / तूट (-) | -३२१.१२ | -१२६.६९ | १५६६.८३ |

**( मिलिंद म्हैसकर )**
**उपाध्यक्ष/ प्राधिकरण**

**( संजय कुमार )**
**सदस्य/ प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग**

**(उदय सामंत )**
**अध्यक्ष / प्राधिकरण**

## बाब क्रमांक : २

**विषय :-  प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी सन २०१९-२०२० करीता कर्मचारी आकृतीबंध.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला व विशद केले कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची स्थापना दिनांक ५.१२.१९७७ रोजी झाली आहे. प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी शासनाने दिनांक १३.१२.१९७७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन १९७७-७८ या वित्तीय वर्षासाठी कर्मचारी आकृतीबंध मंजूर केला होता. तद्नंतर शासनाने दिनांक २७.२.१९७८ रोजीच्या शासन निर्णयान्वये कर्मचारी आकृतीबंध पुढे चालू ठेवण्याचे कार्यवाहीबाबतचे अधिकार प्राधिकरणाला प्रदान केले असून, सदर शासन निर्णयान्वये असे निर्देश दिले आहेत की, यापुर्वी शासनाने दिलेल्या मंजूरीच्या कालावधीनंतर सदर पदे पुढे चालू ठेवण्याबाबत प्राधिकरणाने म्हाड अधिनियम १८ व १९ अन्वये पुढील कार्यवाही करावी. कलम १८ अन्वये मंडळाची स्थापना व कलम १९ अन्वये कर्मचा-यांची नियुक्ती व सेवेच्या शर्ती नमूद केल्या असून, कलम १९(२) मध्ये कोणतेही पद निर्माण करणे व ते भरणे यांच्या संबंधात, राज्य शासन वेळोवेळी, लेखी आदेशाव्दारे निश्चित करील अशा निर्देशांस अधीन राहून, प्राधिकरणास, त्याची कामे कार्यक्षमरित्या पार पाडण्यासाठी, त्यास योग्य वाटतील असे इतर कर्मचारी वेळोवेळी, नियुक्त करता येतील असे नमूद केले आहे.

२/- या संबंधी प्राधिकरणाच्या दिनांक ५.४.१९९७ रोजी झालेल्या १४५ व्या बैठकीत ठराव क्र.५२६४ अन्वये कर्मचारी आकृतीबंधास मंजूरी देतांना असा निर्णय घेण्यात आला आहे की, या पुढील वित्तीय वर्षात कर्मचारी आकृतीबंधामध्ये वेळोवेळी केल्या जाणाऱ्या महत्वपूर्ण बदलांची माहिती प्राधिकरणासमोर सादर करण्यात यावी. या निर्णयास अनुलक्षून सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात कर्मचारी आकृती बंधामध्ये झालेल्या महत्वपूर्ण बदलांची माहिती अर्थसंकल्पीय विशेष बैठकीत प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

३/- महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत ९ विभागीय मंडळांच्या कामाचा आढावा घेण्यात येऊन पदांचा सुधारीत आकृतीबंध शासन निर्णय क्र.आढावा २००३/प्र.क्र.२०/प्रशा.३, दि.१२.१२.२००७ अन्वये मंजूर केला आहे. सदर सुधारीत आकृतीबंधामध्ये प्राधिकरणाच्या २७२३ मंजूर पदांपैकी वर्ग-३ व वर्ग-४ मधील १३९ पदे निरसित करण्याचा निर्णय शासनाने घेतला. उक्त निर्णयाच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या २७२३ मंजूर पदांपैकी वर्ग-३ व वर्ग-४ मधील १३९ पदे निरसित करुन एकूण २५८४ पदांचा सुधारीत आकृतीबंध प्राधिकरण आदेश क्र. प्राधि/आढावा/२००७/ १८९४/प्र.८, दिनांक १६.१.२००८ अन्वये मंजूर केला आहे. शासनाच्या मंजूर आकृतीबंधामध्ये २५८४ मंजूर पदांपैकी ०६ पदे (सुपरन्युमरी पोस्ट) रिक्त झाल्याने निरसित झाली आहेत, यास्तव शासनाच्या मंजूर आकृतीबंधानुसार एकूण पदे २५७८ आहेत. शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील पत्र क्र.गृनिधो-२००८/प्र.क्र.१९७/ भाग २/गृनिधो-२, दिनांक ६/९/२०१० मधील निर्देशास अनुसरुन प्राधिकरणाच्या दिनांक २०/९/२०१० रोजी झालेल्या २३४ व्या बैठकीतील ठराव क्र.६४९९, दिनांक

२०/९/२०१० च्या अनुषंगाने प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/सां.क./२०१०/४७५३/प्र.८, दिनांक ७/१०/२०१० अन्वये प्राधिकरण स्तरावर मुख्य अभियंता-२/प्रा. यांच्या अधिपत्याखाली सांख्यिकीय कक्ष निर्माण करण्यात आला असून, सदर कक्षाकरिता गट-अ ते गट-क मधील एकूण ९ पदांना मंजूरी देण्यात आली आहे. प्राधिकरणाचे आदेश क्र. २३७१, दिनांक ०३.०६.२०१४ अन्वये वरीष्ट लिपीक संवर्गातील १५ पदे कमी करुन लेखासंवर्गात ०९ पदे वाढविण्यात आली.

४/- शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुरुत्थान (JN-NURM) कार्यक्रमांतर्गत बीएसयुपी व आयएचएसडीपी योजनेकरीता म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण म्हणून नियुक्ती केली असून, योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरण स्तरावर स्वतंत्र जेएन-एनयुआरएम कक्ष (JN-NURM Cell) स्थापन करुन आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग देण्याबाबत शासनाने दिनांक ११/६/२००८ रोजी झालेल्या बैटकीत दिलेल्या निर्देशानुसार प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/कक्ष/२००८/३५३५/प्र.८, दि.१६/८/२००८ अन्वये प्राधिकरण स्तरावर स्वतंत्र जेएन-एनयुआरएम कक्ष (JN-NURM Cell) स्थापन करण्यात आला आहे.

जेएनएनयुआरएम कक्षाकरीता प्राधिकरणाच्या टराव क्र.६३८९ दिनांक २४.०२.२००९ आणि टराव क्र. ६४५० दिनांक १४/१/२०१० अन्वये तांत्रिक / अतांत्रिक संवर्गातील गट-अ ते गट-ड मधील ५५ पदे निर्माण करण्यास मान्यता दिली . त्यापैकी शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून निव्वळ Adhoc पध्दतीने मुख्य अभियंता (१ पद), उपमुख्य अभियंता (१ पद), कार्यकारी अभियंता (३ पदे) आणि उप अभियंता (११ पदे) अशी एकूण १६ पदे तात्पुरती निर्माण करण्यात आली आहेत. सन २०१६-२०१७ च्या म्हाडा प्राधिकरणाच्या आकृतीबंधामध्ये शासनाने मंजूर केलेल्या २५८४ पदांपैकी ६ पदे (सुपरन्यूमरी पोस्ट) निरसित झाल्याने ६ (सुपरन्युमरी पोस्ट) कमी करुन (२५७८ + १६ जेएनएनयुआएम +९ सांख्यिकी + ९ लेखासंवर्ग -१५ वरिष्ठ लिपीक +१ अधिसंख्य =२५९८) पदे सन २०१६-२०१७ च्या आकृतीबंधात दर्शविण्यात आली होती.

५/- शासनाच्या वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. वित्त विभाग-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१, दिनांक १४.०१.२०१६ अन्वये प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गड-ड संवर्गातील एकूण मंजूर पदांच्या २५ % पदे निरसित करणे आवश्यक असल्याने प्राधिकरणाचे आदेश क्र. प्राधि/आकृतीबंध/गट-ड/२०१७/१०२४/प्र.१३, दिनांक ०९.०३.२०१७ च्या आदेशान्वये प्राधिकरणाच्या गट-ड संवर्गातील रिक्त असलेली एकूण १११ पदे निरसित करण्यात आली आहेत. तसेच गट ब,क,ड मधील ५२ पदे कमी करुन गट अ,ब व क मध्ये एकूण २३ पदे वाढविण्यात आली त्यानुसार सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता एकूण २४५७ पदे मंजुर होती.

६/- म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक (गट-क) संवर्गात ४८० मंजूर पदांपैकी ४० टक्के पदे गेल्या ५ ते ६ वर्षापासून रिक्त असल्यामुळे सदर रिक्त असलेल्या पदाचा भार कार्यरत असलेल्या लिपीक कर्मचा-यांवर पडून,त्याचा परिणाम म्हाडाच्या एकूण महसुलाच्या वसूलीवर होत आहे. तसेच, प्रलंबित प्रकरणांची संख्या ओघाने वाढत असल्यामुळे वरिष्ट लिपीक (गट -क) संर्गात ४८० मंजूर पदांपैकी गेली कित्येक वर्षापासून रिक्त असलेली पदे कमी करून, ती पदे सहाय्यक व कनिष्ट लिपीक - टंकलेखक (गट-क) संवंगात पदे वाढविण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचाराधीन असल्यामुळे प्रशासकीय व कार्यालयिन कामाचा समतोल राखण्याच्या दृष्टीकोनातून प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील

लिपीक कर्मचा-यांची संख्या विचारात घेऊन, आकृतीबंधातील मंजूर पदांच्या मर्यादीत वेतना वरील खर्च मंजूर आकृतीबंधावरील वेतन खर्चापेक्षा जास्त होऊ नये या आर्थिक बाबीचा विचार करून प्राधिकरणाच्या दि.३० मे २०१८ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक संर्वातील ४८० मंजूर पदांपैकी गेली कित्येक वर्षापासून रिक्त असलेली १०० पदे कमी करून वरिष्ठ लिपीक संवर्गात ३८० पदे, सहाय्यक संवर्गात ३० पदे व कनिष्ठ लिपीक संवर्गात ५२ पदे वाढवण्यात आली आहेत. त्यानुसार सन २०१८-२०१९ च्या आकृतीबंधामध्ये सहाय्यक संवर्गात २५१ वरून २८१ पदे वरिष्ठ लिपीक संवर्गात ४८० वरून ३८० पदे व कनिष्ठ लिपीक संवर्गात २६६ वरून ३१८ पदे निश्चित करण्यात आली आहेत.

७/- सन २०१८-२०१९ मधील मंजूर आकृतीबंधानुसार म्हाडा प्राधिकरणाच्याआस्थापनेवर सफाईकामगार (गट - ड) या संवर्गात एकूण २१ पदे मंजूर असून, ५ पदे भरलेली व १६ पदे रिक्त आहेत. तसेच सफाई कामगार तथा हमाल (गट-ड) या संवर्गात मंजूर असलेले एक पद रिक्त आहे.

सध्यस्थितीत म्हाडा अंर्तगत प्रादेशिक मंडळाच्या वसाहतीतील इमारतींच्या देखभालीबाबतची कामे गृहनिर्माण संस्थाकडे वर्ग केली आहेत. त्यामुळे म्हाडा व प्रादेशिक मंडळातील सफाईची कामे खाजगी एजन्सीमार्फत करुन घेतली जातात. सदर बाब विचारात घेऊन सफाईकामगार या संवर्गात रिक्त असलेली १६ पदे व सफाईकामगार तथा हमाल या संवर्गातील रिक्त असलेले १ पद अशी एकूण १७ पदे शिपाई या संवर्गातील समकक्ष असलेल्या वेतनश्रेणी मध्ये वर्ग करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

उपरोक्त परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केल्यानुसार प्राधिकरणाचा टराव क्रमांक ५२६४, दिनांक ५.४.१९९७ अन्वये घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात १) पदांचे पुनर्नामाभिकरण, २) पदांची अदलाबदल, ३) प्राधिकरणाच्या आस्थापनेवर राखीव गटात पदे ठेवणे, ४) पदांचे फेरवाटप, ५) पदे परावर्तीत करणे, ६) राखीव गटातील पदे कार्यान्वीत करणे, इत्यादीमुळे कर्मचारी आकृतीबंधात झालेले महत्वपूर्ण बदल प्राधिकरणाच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे तपशीलासह सादर करण्यात येत आहेत.

१. प्राधिकरणाचे आदेश क्र प्राधि/आकृतीबंध/२०१८/१७३२/दि.३०/०५/२०१८अन्वये म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापने वरील वरिष्ठ लिपीक संवर्गातील ४८० मंजूर असलेल्या पदांपैकी १०० पदे कमी करून वरिष्ठ लिपीक संवर्गात ३८० पदे निश्चित केली तसेच सहाय्यक संवर्गात ३० पदे वाढवून सहाय्यक संवर्गात २५१ वरुन २८१ पदे व कनिष्ठ लिपीक संवर्गात ५२ पदे वाढवून २६६ वरुन ३१८ पदे निश्चित करण्यात आली.

२ प्राधिकरणाचे आदेश क्र प्राधि/बदली/२०१८/३१८१/प्र-८/ दि.०५/१०/२०१८ अन्वये मुं.इ.दु व पु. सहाय्यक संवर्गातील एक पद पदासहीत अमरावती मंडळाच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात आले आहे.

३ प्राधिकरणाचे आदेश क्र प्राधि/संकीर्ण/२०१९/२०१७/ प्र-७/ दि.२४/०१/२०१९ अन्वये औरंगाबाद मंडळातील सहाय्यक विधि सल्लागार (गट-ब) संवर्गातील १ पद हे पदासहीत नाशिक मंडळाच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात आले व नाशिक मंडळातील विधी सहाय्यक (गट-क) हे एक पद औरंगाबाद मंडळाच्या आस्थापनेवर पदासहीत वर्ग करण्यात आले आहे.

८/- प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील नियमित कर्मचारी आकृतीबंधा व्यतिरिक्त विभागीय मंडळामध्ये अस्थायी आस्थापनेवर कर्मचारी कार्यरत आहेत.

सध्या विभागीय मंडळात कार्यव्ययी अस्थायी आस्थापनेवर वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये एकूण **४०** कर्मचारी कार्यरत आहेत. (परिशिष्ट-६) त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम (M.C.S.R.) लागू आहेत. सदरहू बाब प्राधिकरणाच्या माहिती करीता सादर करण्यांत येत आहे.

९/- बाब टिप्पणी सोबत मागील ५ वित्तीय वर्षात भांडवली बांधकाम खर्चाच्या तुलनेने झालेल्या आस्थापना खर्च दर्शविण्यात येणारा तक्ता जोडण्यात आला आहे. (परिशिष्ट-८ ते परिशिष्ट-१२) तसेच, चालू वर्षाच्या कर्मचारी आकृतीबंधात वर्ग-१ ते वर्ग-४ मधील मंजूर पदांची संख्या **२४१९** + **३ अधिसंख्य** = **२४२२** आणि जेएन-एनयुआरएम कक्षाकरिता तात्पुरती (Adhoc) **१६** पदे अशी एकूण **२४३८** मंजूर पदे दर्शविण्यात आली आहेत. प्राधिकरणाच्या आकृतीबंधामध्ये झालेल्या बदलांची / दुरुस्तीची नोंद घेऊन त्याप्रमाणे सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता कर्मचारी आकृतीबंध प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीत माहितीसाठी सादर करण्यात येत असल्याचे सांगितले.

सन्माननीय सदस्यांनी सदर माहितीची नोंद घेतली.

विषयसूचीवरील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेतल्यानंतर मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांनी उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार मानले व बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

**( मिलिंद म्हैसकर )**
**उपाध्यक्ष/ प्राधिकरण**

**( संजय कुमार )**
**सदस्य/ प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग**

**(उदय सामंत )**
**अध्यक्ष / प्राधिकरण**